# <u>मुंबई विद्यापीठ</u>

आस्थापना – १

IS
क्र.~~इएसटी~~/आयसीटी/४१/२०१३-१४/14483
मुंबई – ४०० ०३२.
8 ऑगस्ट, २०१३.

संदर्भ :– १) कार्यालयीन परिपत्रक क्र.इएसटी/आयसीडी/२०१२-१३/१९४८,
दिनांक ५ डिसेंब्रर, २०१२.
२) कार्यालयीन परिपत्रक क्र.इएसटी/आयसीडी/२०१२-१३/१९४८,
दिनांक १२ जून, २०१३.

**परिपत्रक :–**

विद्यापीठातील विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, प्रभारी प्राचार्य सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रथांलय, परीक्षा नियंत्रक, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री, वित्त व लेखा अधिकारी आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग /कक्ष प्रमुख, यांना संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकानुसार त्यांच्या अधिपत्याखालील गट 'अ' ते गट 'क' संवर्गात विविध पदांवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकेतर अधिकारी / कर्मचा-यांचे परीपूर्ण गोपनीय अहवाल विहित कालावधीत या विभागांस सादर करणेबाबत कळविले होते. सदर परिपत्रकानुसार आवश्यक असलेले गोपनीय अहवाल विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने संबंधित विभाग प्रमुखांना संदर्भ क्रमांक २ च्या कार्यालयीन परिपत्रकानुसार विद्यापीठातील अधिकारी / कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकारी आणि पुनर्विलोकन अधिकारी यांचे निरंक्षणासह, सही शिक्क्यानिशी आस्थापना विभागास सादर करण्यास कळविले आहे असे असूनही विद्यापीठातील बहुतांश अधिकारी / कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल अद्यापही आस्थापना विभागास प्राप्त झालेले नाहीत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१०१३/ प्र.क्र./५५/कोषा प्र – ५, दिनांक ९ जुलै, २०१३ अन्वये गोपनीय अहवाल विहित वेळापत्रकानुसार लिहिण्याची जबाबदारी पार न पाडणा-या अधिका-यांची **<u>दिनांक १ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ मंजूर न करणेबाबत शासन आदेश आहेत.</u>**

त्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील गट 'अ' ते गट 'क' संवर्गात विविध पदांवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकेतर अधिकारी / कर्मचा-यांचे परीपूर्ण गोपनीय अहवाल त्वरीत आस्थापना विभागांस सादर करावेत अन्यथा संबंधितावर परिपत्रकातील सूचना / आदेशानुसार कार्यवाही करण्यांत येईल, कृपया याची नोंद घ्यावी.

12/8/13

कुलसचिव